# निर्माल्य

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**निर्माल्य : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ २४०/-

# निर्माल्य

# १

दिवाळी नव्हती, पण फटाक्यांचा आवाज तर होत होता. किती वेळ तरी होत होता. वेश्यांच्या त्या मोहल्ल्यात कमी-अधिक आश्चर्यकारक गोष्टी केव्हा घडतील याचा नेम नसे. आनंदाची बेहोषी, दुःखाचे टाहो, संतापलेली शिवीगाळ, हाणामारी, भांडणतंटा, रडारड असे हर्ष-खेदाचे प्रकार म्हणजे त्या मोहल्ल्यातील नित्याचेच प्रकार होते. परंतु 'रोज मरे त्याला कोण रडे?' हा न्याय इथे लागू नव्हता. जरा काही गडबड झाली की ती हसविणारी असो, रडविणारी असो, पाहण्यासाठी दुतर्फाच्या माड्यामाड्यातल्या वेश्या गॅलरीत जमा होत असत. त्यांच्याकडे आलेली गिऱ्हाइकं त्यांच्या मागोमाग येऊन वाकून पाहू लागत असत. ''काय झालं?'' ''काय झालं?'' अशा उद्‌गारांचा चिवचिवाट हवेत भरून रहात असे. मोठाच गलका उठत असे. अर्धी-पाव घटका अशी गेली की मोहल्ल्यात पुन्हा शांतता पसरत असे. ज्यांच्याकडे गिऱ्हाइकं आलेली असत त्या वेश्या आपापल्या खोल्यात शिरत असत. ज्या गिऱ्हाइकावाचून रिकाम्या असत त्या गॅलरीतच रेंगाळत असत, खाली रेंगाळत चालणाऱ्या पुरुषांना न्याहाळून त्यांपैकी कोण जिना चढण्याच्या विचारात आहे त्याचा अदमास घेऊ लागत असत.

फटाक्यांचा फाड्‌फाड् आवाज होत राहिला तेव्हा शेजारच्या आणि समोरच्या माड्यांच्या गॅलऱ्यात बायका धावून जमा झाल्या. कोण फटाके सोडीत आहे,

असं एकमेकींना विचारू लागल्या...त्यांच्या जिज्ञासेचं समाधान व्हायला वेळ लागला नाही. दिवाळी नसूनही फटाक्यांचे सरावर सर कोण आहे आणि का सोडीत होतं ते त्यांना कळलं...

शांता, सुचित्रा आणि कावेरी ज्या माडीत रहात होत्या तिच्या गॅलरीत फटाक्यांचे सर पेटविले जात होते. तीन गिऱ्हाइकं आली होती आणि ते तिघे पुरुष कसल्या आनंदात होते कुणास ठाऊक, त्यांनी आल्यापासून एकच जल्लोष उडवून दिला होता. ते खूप दारू प्याले होते, गाणी म्हणत होते, नाचत होते, शांता, सुचित्रा आणि कावेरी या तिघींना दारू पाजीत होते, आपल्याबरोबर गाण्याचा आणि नाचण्याचा आग्रह करीत होते. त्यांनीच आता फटाक्यांच्या माळावर माळा उडवायला सुरुवात केली होती. ताड्ताड् अशा आवाजांनी मोहल्ला दुमदुमत होता. शांता, सुचित्रा आणि कावेरी यांच्या गळ्यात गळे घालून ते तिघे पुरुष गॅलरीत नाचत होते, हसत होते. त्या तिघींना आपल्याबरोबर उच्च स्वरात गाण्याचा आग्रह करून गाणं म्हणत होते,

**''कदम कदम बढाये जा**
**खुशीके गीत गाये जा**
**यह जिंदगी है कौमकी**
**तू कौमपे लुटाये जा**
**तू शेर-ए-हिंद आगे बढ**
**मरनेसे फिर भी तू न डर**
**अस्मान तक-''**

मध्येच गाणं म्हणण्याचं सोडून देऊन उंच आभाळाकडे हात करून ते विकट हास्य करीत होते आणि मग एकाएकी त्या तिघी पोरींनी दूर ढकलून एकमेकांच्या गळ्यात गळा घालून रडू लागत होते.

त्यांच्या तोंडचे ते गीत एखाद्या चित्रपटात ऐकल्याची ओळख न पटल्यामुळे आजूबाजूच्या गॅलरीत जमलेल्या बाया एकमेकीला विचारीत होत्या, ''कुठलं गाणं म्हणताहेत गं हे लोक?'' आणि उत्तर देत होत्या, ''ओळखीचं नाही. कुठलं काढलंय कुणास ठाऊक!'' त्या गाण्याची चाल आणि ताल उघड उघड लष्करी होता, गाण्याचा अर्थही वीरश्रीचा होता. कलकत्ता शहरातील या कुप्रसिद्ध रंगेल



मोहल्ल्यात वेश्यांकडे आलेल्या पुरुषांनी दारूनं झिंगून गाणी म्हणण्याचा प्रकार आज काही प्रथमच घडत नव्हता. परंतु असल्या वीरश्रीच्या गाण्याचे स्वर या मोहल्ल्याच्या हवेत प्रथमच तरंगत होते, आणि भोवतालच्या दृश्याशी काहीस विसंगत वाटत होते. साहजिकच शांता, सुचित्रा आणि कावेरी यांच्याकडे येऊन गोंधळ घालणारे हे तीन पुरुष केव्हा आले, कुठून आले. कलकत्त्याचेच होते की कुठून परगावाहून आले होते, याबद्दल गॅलरीतल्या बायका आपआपसात कुतूहलानं प्रश्न करू लागल्या. ज्यांना जेवढं माहीत होतं तेवढं त्या इतरांना सांगू लागल्या...

दिवेलागणी होऊन अर्धी पाव घटका झाली असेल. या मोहल्ल्यातली दिवसभर आळसात निजून राहिलेली वेश्यांची दुनिया जागी झाली होती. बाहेरच्या जगाचा दिवस संपला होता. या मोहल्ल्यातील जगाचा दिवस सुरू होत होता. माड्यामाड्यांतले दिवे लागले होते. खोलीखोलीतल्या स्त्रिया वेशभूषा आटोपून मुखप्रसाधन करून खिडकीखिडकीतल्या दिव्याखाली बसत होत्या. मोहल्ल्यातल्या रोज रात्रीचा गजबजाट आणि चेट, वीट, रंगेल छंदीफंदी यांची वर्दळ सुरू व्हायला अजून तीन घटकांचा अवकाश होता. परंतु तुरळक रहदारी सुरू झाली होती. हॉटेलातील कपबशांचा खळखळाट आणि उंच स्वरातल्या ललकाऱ्या वाढू लागल्या होत्या. मोहल्ल्याचा रस्ता काहीसा बाजूस आणि अरुंद होता, परंतु पलीकडे मोठा रुंद रस्ता होता, तो घाईगर्दीच्या वर्दळीनं गजबजून गेला होता आणि त्या गजबजाटाचा आवाज नदीच्या पुराचं ओसंडणारं पाणी आजूबाजूस शिरावं त्याप्रमाणे या मोहल्ल्यात शिरून तरंगत होता. पलीकडच्या मोठ्या रस्त्याच्या कोपऱ्यावर वळून या मोहल्ल्यात शिरणारी सारीच माणसं काही बे घडीची मौज शोधणारी नव्हती. परंतु त्यातला एखाद दुसरा पुरुष तसा होता, आणि खिडक्या-खिडक्यांत बसलेल्या बायका अशा माणसाची नजर सराईतपणानं ओळखीत होत्या.

शांता, सुचित्रा आणि कावेरी एकमेकीला लगटून गॅलरीत उभ्या होत्या. तीन रिक्षे एकामागोमाग मोहल्ल्यात शिरलेले त्यांना दिसले. त्यातल्या पुरुषांची नजर ओळखून शांतानं सुचित्राला आणि सुचित्रानं कावेरीला चिमटा घेतला. त्या एकमेकीशी काही बोलल्या नाहीत किंवा त्यांनी परस्परांकडे बघितलंदेखील नाही,

परंतु चिमट्याचा बिनतारी संदेश समजल्याप्रमाणे त्या तिघी एकदम हसल्या. त्याच क्षणी सगळ्यात पुढच्या रिक्षातल्या इसमाची नजर वर त्यांच्याकडे गेली. तो नुसता हसलाच नाही, तर एकदम खाली उडी टाकून मागोमाग येणाऱ्या आपल्या दोघा सोबत्यांना म्हणाला,

''उतरा खाली...''

ते तिघे पुरुष आपल्या माडीचा जिना चढून वर येणार अशी खात्री पटल्याबरोबर शांता, सुचित्रा आणि कावेरी गॅलरीतून परतल्या. ते तिघे खोलीच्या दाराशी आले तो त्यांचं यथोचित स्वागत करायला त्या हजर झाल्या. त्या तिघांच्या पोशाखावरून ते तिघेही परप्रांतीय होते ही गोष्ट चातुर्यानं ओळखून सुचित्रानं इंग्रजीत अभिवादन केलं, ''गुड ईव्हिनिंग!'' त्या तिघौंपकी जो सगळ्यात अधिक वयस्क होता त्यानं हसून विचारलं, ''तुम्ही इंग्रजी बोलता?'' ''लीटल् लीटल्'' असं म्हणून सुचित्रा हसली.शांता आणि कावेरीदेखील खुद्कन् हसल्या. 'ओ डार्लिंग' असा उद्‌गार काढून त्या माणसानं एकदम सुचित्राच्या कमरेभोवती डावा हात लपेटून तिला जवळ ओढली आणि तिचा मुकाच घेतला. वेश्यागमनाच्या बाबतीत तो अगदी सराईत असल्याचं सुचित्रानं ओळखलं. अशा माणसाशी कसं वागावं ते सुचित्राला ठाऊक झालं होतं. तिनंही निःसंकोपणानं उजवा हात त्या वयस्क पुरुषाच्या अंगाभोवती टाकला आणि त्याला खुर्चीकडे नेता नेता त्याच्या दोघा सोबत्यांकडे हसत बघून ती म्हणाली, ''या ना, बसा.''...त्या तिघांपैकी जो सगळ्यात वयानं लहान होता त्याच्याकडे बघून तो म्हणाला, ''अरे भाई मिलिंद, असा इथे आराम बैस ना. अशा मजेच्या ठिकाणी आल्यावर संकोच करायचा नसतो. साऱ्या गोष्टी आपल्या हक्काच्या आहेत असं समजून वागायचं असतं.'' त्या तिघींकडे बघून त्यानं खुलासा केला, ''आमचा  मिलिंद अशा जागी कधी आलेला नाही. बच्चा आहे. नवखा आहे. साहजिक बुजतो आहे. पण नव्या माणसाची बूज कशी घालवावी ते तुम्हाला ठाऊक आहे.'' त्याने कावेरीला डोळा मारला आणि म्हटलं, ''अगं पोरी, पदराआड हसणं लपवून अशी दूर काय उभी राहिलीस? माझ्या मित्राला घे ना ताब्यात.''

त्या तिघी हसल्या, आणि मिलिंद अंग चोरून खुर्चीवर बसला होता त्याच्याजवळ कावेरी जाऊन बसली आणि तिनं त्याचा हात आपल्या हातात



घेतला, तेव्हा त्या वयस्क माणसानं ''शाबास!'' असं म्हटलं. त्याबरोबर त्या तिघी आणखीन खदखदून हसल्या. मिलिंद मात्र हसला नाही. त्यानं आपला हात कावेरीच्या हातातून काढून घेतला आणि भांबावलेला चेहरा करून त्या वयस्क माणसानं ''शाबास!'' असं म्हटलं. त्याबरोबर त्या तिघी आणखीच खदखदून हसल्या. मिलिंद मात्र हसला नाही. त्यानं आपला हात कावेरीच्या हातातून काढून घेतला आणि भांबावलेला चेहरा करून त्या वयस्क माणसाला तो म्हणाला, ''मेननसाब, मी तुमच्या आग्रहाखातर आलो आहे, परंतु मला भलता आग्रह करू नका.''

मेनन मोठ्यांदा हसला आणि म्हणाला, ''अरे भाई मिलिंद, अशा जागी आल्यावर कोणतीच गोष्ट भलती नसते, लक्षात ठेव. काय खरं की नाही?'' असा प्रश्न करताना त्यानं डाव्या हाताच्या मिठीत धरलेल्या सुचित्राकडे बघितलं आणि विचारलं, ''तुझं नाव सांग ना आम्हाला.''

सुचित्रानं स्वतःचं नाव तर सांगितलंच, पण आपल्या मैत्रिणींचीही नावं सांगितली. ती ऐकून इंग्रजीत ''फार छान, फार छान,'' असं म्हणत मेनननं त्या तिघींना न्याहाळून घेतलं...साधारणपणे पंचविशीच्या सुमाराच्या होत्या त्या तिघीही, त्यांनी आपले विपुल केशभार बंगाली पद्धतीनं मोकळे सोडलेले होते. भांगात शेंदूरही घातला होता. परंतु त्यांनी साड्या मात्र परिधान केल्या होत्या. बंगाली पद्धतीनं नव्हे, तर महाराष्ट्रीय पद्धतीनं. तिघीही काळ्या सावळ्याच होत्या. परंतु तिघींचीही अंगलट मोठी बांधेसूद आणि गोल होती, चेहरे आकर्षक होते, आणि मोठमोठ्या डोळ्यांची ठेवण अगदी अस्सल बंगाली होती. त्यांच्याकडे बघता बघता मोठ्या खुशीचं हास्य मेननच्या चर्येवर पसरलं, आणि त्यानं हसत हसत आपली व आपल्या दोघा मित्रांची ओळख करून दिली, ''माझं नाव मेनन, हे आमचे शर्मासाहेब, आणि हे मिलिंद.''

सुचित्रानं विचारलं, ''इथं कलकत्त्यासच असता आपण?''

''नाही.''

''कुठून येणं झालं आपलं?''

''असेच आलो मुशाफरी करीत करीत. म्हटलं, कलकत्ता बघावं.''

''मग आवडलं की आपल्याला आमचं गाव?''

''गाव आवडलं, नाव आवडलं, सारं काही आवडलं.''

सुचित्राच नव्हे, तर शांता आणि कावेरीदेखील हसल्या.

मेनन ओळख करून देऊ लागला तेव्हा मिलिंदला वाटलं होतं, आता हा गृहस्थ काय काय सांगतो आहे कुणास ठाऊक! खरी हकीगत गुप्त ठेवायला हवी होती असं नव्हे, पण तिची वाच्यता या धंदेवाल्या पोरींजवळ कशाला करायची? सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सैन्यात आम्ही होतो, त्या सैन्यानं अभूतपूर्व पराक्रम केले, कोहिमापर्यंत मजल मारली, इंफाळला वेढा दिला, पण पुढे दैवाचं चक्र फिरलं, आणि पीछेहाट सुरू झाली. युद्धातलं यश राहिलं बाजूलाच, अपयशाचे चौफेर तडाखे बसू लागले. सुभाषबाबूंचाही अकस्मात मृत्यू घडला, आणि सारीच केविलवाणी वाताहत झाली. या अभागी लोकांपैकी आम्ही तिघे आहोत. जीव घेऊन पळता पळता कोणती कोणती संकटं सोसली ते आमचं आम्हाला माहीत. इथे कलकत्त्यास आलो, माणसांत वावरू लागलो, ही गोष्ट काही वेळ खरीच वाटेना. चार सहा दिवस झाल्यावर ती खरी वाटू लागली. आता आमच्या आयुष्याची काय तऱ्हा होणार आहे ते एक परमेश्वरालाच माहीत! उद्या मेनन कोचीनला जाईल, शर्मा असाच उत्तर प्रदेशातल्या आपल्या गावी जाईल. तीन दिशांनी आलेली आम्ही तीन माणसं सुभाषबाबूंच्या झेंड्याखाली एकत्र आलो होतो, आता आपापल्या दिशेनं जाऊ. आमची फाटाफूट होईल. मेननसाहेब म्हणाले, एकत्र संगतीची ही अखेरची रात्र मजेत काढायची. कलकत्त्याच्या एका मित्राकडून त्यांनी पैसेही आणले, आणि आम्हाला म्हणाले, ''दोस्तहो, चला जाऊ या.''' ही सारी विचित्र कहाणी मेननसाहेब सुचित्राला सांगतात की काय असं मिलिंदच्या मनात आलं, आणि तो काहीसा अस्वस्थ झाला...तसं काही घडलं नाही तेव्हा त्याला बरं वाटलं, ''असेच आलो मुशाफरी करीत करीत. म्हटलं, कलकत्ता बघावं.'' असं मेननचं संदिग्ध उत्तर दिलं. मिलिंद मनाशी म्हणाला, हा माणूस चतुर आहे खराच. मेननचं संदिग्ध उत्तर सुचित्रालाही पुरेसं वाटलं. तिनं खोलात शिरून काही विचारलं नाही, तेव्हा तिच्याकडे बघत मिलिंद मनाशी म्हणाला, इथले रीतिरिवाजच असे दिसताहेत, कुणी कुणाची फाजील चौकशी करायची नाही, मजा द्यायची, मजा घ्यायची, दूर व्हायचं!...



आपल्या विचारांच्या तंद्रीतून मिलिंद बाहेर पडला तेव्हा मधोमध छोटंसं टेबल मांडलं गेलं होतं, ग्लास ठेवले गेले होते. शांता बिअरच्या बाटल्या फोडून एकेक ग्लास भरीत होती...हे साहित्य कुणी मागविलं, केव्हा आलं, ते त्यांना कळलं नव्हतं. स्वतःशी विचार करता करता तो मनानं कोहिमाच्या छावणीवर गेला होता, भारताच्या सरहद्दीकडे येण्यासाठी जंगल तुडवीत होता, तहानभुकेनं व्याकूळ झाला होता, तेव्हा मेननने दारू मागविली असली पाहिजे व हे ग्लास व या बाटल्या प्रकट झाल्या असल्या पाहिजेत...केशरी रंगाच्या फेसदार पेयानं भरलेले ग्लास बघून मिलिंदला एकदम बरं वाटलं. त्यानं वेश्यागमन कधी केलं नव्हतं, परंतु त्याला बिअरची आवड फार होती. किती तरी दिवसांनी अशा प्रकारे निवांतपणे तो बिअर पिणार होता. कुणी आग्रह न करता खूप पिणार होता. त्या पेयाच्या नशेत खडतर दिवसांच्या असंख्य आठवणी बुडवून टाकणार होता. ज्या काळात सुभाषबाबूंची स्वातंत्र्यसेना पराक्रमावर पराक्रम करीत कोहिमच्या दिशेनं गेली होती त्या काळात पुन्हा प्रविष्ट होणार होता...

कावेरीनं त्याच्या हाती भरलेला ग्लास दिला, तेव्हा त्यानं अधाशीपणानं मोठा घोट घेतला...त्याला काय वाटलं कुणास ठाऊक, त्यानं कावेरीच्या कमरेभोवती हात लपेटून तिला जवळ ओढलं आणि ग्लास हवेत उंच करून तो प्रथम आपल्या दोघा दोस्तांकडे आणि नंतर त्या तिघी बंगाली पोरींकडे बघून मोठ्यांदा इंग्रजीत म्हणाला, ''जे यशाचे आणि आनंदाचे दिवस घालविले त्या दिवसांच्या आठवणीसाठी!'' मेनन आणि शर्मा यांनीही ग्लास उंच करून त्याच्या शब्दांचा पुनरुच्चार केला, ग्लास रिकामे केले, आणखी बाटल्या आणावयाचा हुकूम सोडला...बाटल्या आल्या, ग्लास भरले गेले, पिण्याची फैर पुन्हा झडली.

आता मेननचा सावध संयम सैल झाला होता. त्यानं सुचित्राला एकदम आलिंगन दिलं आणि म्हटलं, ''आमचे नेताजी म्हणजे खरोखर परमेश्वराचे अवतार होते. पण आपल्या देशाचं आणि तुमचं आमचं नशीबच खडतर.'' तिच्या खांद्यावर डोकं ठेवून तो हुंदके देऊ लागला...त्याचं ते एखाद्या लहान मुलासारखं रडणं बघून सुचित्रा भांबावून गेली, परंतु क्षणभरच. गिऱ्हाइकांच्या नाना तऱ्हा तिला परिचित होत्या. वेश्यागमन करतानाही प्रतिष्ठित सभ्यतेनं वागणाऱ्या, वृद्ध असूनही-किंवा असल्यामुळेच!...भलतीच वाह्यात अश्लील बडबड करणाऱ्या,